# कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर

श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर - ४१६ ००५ ऑफिस : (०२३१) : २६५१४०४, २६५०१३०, संगणक विभाग : २६५१७०५

Website :-www.apmckolhapur.com Email : am_kolhapur@msamb.com

**कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूरकडे खालील नमूद पदाबाबत अर्ज मागविणेत येत आहेत.**

| अ. नं. | पदाचे नाव | संख्या | वयोमर्यादा | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक | १२ | १८ वर्षापेक्षा कमी नसेल व ३० वर्षापेक्षा अधिक नसेल. | समिती धोरणानुसार |
| २ | बांधकाम पर्यवेक्षक | १ | --,,-- | --,,-- |
| ३ | शिपाई | २ | १८ वर्षापेक्षा कमी नसेल व ३५ वर्षापेक्षा अधिक नसेल. | --,,-- |
| ४ | वॉचमन | ९ | --,,-- | --,,-- |

**शैक्षणिक पात्रता**

| अ. नं. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | टीप |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक | किमान एस. एस. सी. पास किवा तत्समतुल्य परीक्षा तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक ज्ञान यांना प्राधान्य. | विहित केलेली वयोमर्यादा पुढील क्रमांक १ ते ४ बाबतीत ५ (पाच) वर्षेपर्यंत शिथिल करणेत येईल. १) ज्या उमेदवाराने बाजार समितीत किंवा एखाद्या सहकारी संघटनेत / संस्थेत तीन वर्षे अखंड सेवा केली असेल असा उमेदवार.<br>२) संचालकांनी मान्यता व मंजुरी दिलेले प्रशिक्षण घेतलेला उमेदवार,<br>३) माजी सैनिक<br>४) अतीउच्च अर्हता असलेला व बाजार समितीच्या किंवा सहकारी चळवळीच्या कामकाजात अनन्यसाधारण अनुभव असलेला उमेदवार. |
| २ | बांधकाम पर्यवेक्षक | बी. ई. (सिव्हील) | |
| ३ | शिपाई | ९ वी पास | |
| ४ | वॉचमन | ९ वी पास | |

| अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे | | अटी व शर्ती | |
|---|---|---|---|
| कनिष्ठ लिपिक /<br>बांधकाम पर्यवेक्षक | शिपाई / वॉचमन | १ | उपरोक्त भरावयाच्या पदासाठी लेखी अर्ज कार्यालयीन कामकाजादिवशी दि. २०/०१/२०२० पर्यंत विहित कागदपत्रांसह कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर यांचे श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर येथील मुख्य कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत देऊन पोहोच घेणेची आहे.<br>**विशेष सूचना :** यापूर्वी दि. १०-३-२०१९ चे जाहिरातीस अनुसरून ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले असतील त्यांचे अर्ज विचारात घेणेत येतील. त्यांनी नव्याने अर्ज करणेची आवश्यकता नाही. |
| १) शैक्षणिक पात्रतेबाबत गुणपत्रिका | १) शैक्षणिक पात्रतेबाबत गुणपत्रिका | २ | उपरोक्त पदे महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्या खालील नियम १९६७ तसेच मंजूर सेवा नियम व मंजूर सेवा प्रवेश नियम, पणन संचालनालय यांचेकडील तरतुदीस अनुसरून तसेच मा. विभागीय आयुक्त कार्यालय (मागासवर्ग कक्ष) पुणे विभाग, पुणे यांचेकडील रोस्टर मान्यतेस अधीन राहून भरती करणेत येईल. |
| २) संगणक ज्ञान, टायपिंग ज्ञानबाबतचे प्रमाणपत्र (आवश्यकतेनुरूप पदासाठी) | २) जातबाबत पडताळणी प्रमाणपत्र | ३ | उपरोक्त सर्व पदांबाबत प्रथम परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी म्हणून ६ महिने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेत येईल. |
| ३) जातबाबत पडताळणी प्रमाणपत्र | ३) सेवायोजन / समाजकल्याण नोंदणी प्रमाणपत्र (असलेस) | ४ | उपरोक्त भरावयाच्या पदासाठी समिती मार्फत २०० गुणांची लेखी परीक्षा घेणेत येईल. |
| ४) सेवायोजन / समाजकल्याण नोंदणीप्रमाणपत्र (असलेस) | ४) अनुभवाचा दाखला (असलेस) | ५ | उपरोक्त भरावयाच्या पदांची भरती ही कोल्हापूर शहर न्यायकक्षेत असेल. |
| ५) अनुभवाचा दाखला (असलेस) | ५) शारीरिकदृष्टया सक्षम असलेबाबतचे प्रमाणपत्र | ६ | उपरोक्त भरावयाच्या पदांबाबत संपूर्ण अधिकार वरील कायदा, कानू, सेवा प्रवेश नियम, सेवानियम यास अधीन राहून बाजार समितीचा असेल. |
| ६) शारीरिकदृष्टया सक्षम असलेबाबतचे प्रमाणपत्र | ६) राजपत्रीत अधिकारी, विधानसभा, विधान परिषदेची किवा संसदेचा सदस्य स्थानिक प्राधिकारी संस्थेचा किवा बाजार समितीचा मा. अध्यक्ष किवा मा. सदस्य यांचेपैकी एकाचे वर्तणुकीचे प्रमाणपत्र. | ७ | मूळ कागदपत्रे तपासणीचेवेळी सादर करणेची आहेत. पदनिहाय स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. |
| ७) राजपत्रीत अधिकारी, विधानसभा, विधान परिषदेची किवा संसदेचा सदस्य स्थानिक प्राधिकारी संस्थेचा किवा बाजार समितीचा मा. अध्यक्ष किवा मा. सदस्य यांचेपैकी एकाचे वर्तणुकीचे प्रमाणपत्र. | | ८ | भरती प्रक्रियेसंदर्भात वाद अगर तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेणेचा अधिकार बाजार समितीचा असेल. याबाबत कोणासही दावा सांगता येणार नाही. |
| | | ९ | नमूद भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता स्थगित करणे किंवा रद्द करणे याबाबतचा संपूर्ण अधिकार व निर्णय हा बाजार समितीचा अंतिम असेल. |

**विशेष सूचना : यापूर्वी दि. १०-३-२०१९ चे जाहिरातीस अनुसरून ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले असतील त्यांचे अर्ज विचारात घेणेत येतील. त्यांनी नव्याने अर्ज करणेची आवश्यकता नाही.**

शिक्का

सही/-
**(मोहन रामचंद्र सालपे)**
सचिव

सही/-
**(दशरथ तातोबा माने)**
सभापती